भाग १२

।। चिंतनक्षण ।।

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

।। चिंतनक्षण ।।

भाग : १२

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

* **चिंतनक्षण : भाग-१२** *

पुस्तकरूपाने प्रकाशित सातवी आवृत्ती : सप्टेंबर २०१४

डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com

युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka

अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

गुरू जे जे देतात आणि
जे जे देत नाहीत त्यांतली त्यांची
कल्याणबुद्धी जाणून दोन्हींतही
आनंदाने जगतो तो खरा शिष्य!

ईश्वरदत्त विलक्षण बुद्धी केवळ स्वार्थाच्या पूर्तीसाठी वापरणे ही ईश्वराची फसवणूक आहे. ती बुद्धी थोडीतरी त्याच्या शोधासाठी व प्राप्तीसाठी वापरावी.[३३२]

आज्ञा विचारणाऱ्या आणि तरीही
त्या न पाळणाऱ्या शिष्यांना
सद्‌बुद्धीने आज्ञा देत राहाणे, हा
खऱ्या गुरूच्या प्रारब्धातील
'निष्काम कर्मयोग' आहे.३३३

देहाचा मृत्यू म्हणजे 'सर्व संपून' - 'मुक्ती' - हे जर एवढे सोपे असते तर हत्त्या आणि आत्महत्त्या हे मुक्तीचे सोपे राजमार्ग ठरले असते. ३३४

‘घर’ बांधणे आणि त्यात राहाणे हे कर्तव्याचे काम असले तरी त्यालाच ‘जग’ समजले तर तोच तुरुंग ठरून मुक्तीच्या आड येऊ शकतो.३३५

कपाटे भरून ग्रंथ घरात बाळगणे
काय आणि पाठ करून डोक्यात
बाळगणे काय - उपयोगात व
आचरणात येत नसेल तर दोन्ही
देखावे व ओझीच आहेत. ३३६

भाग्याची जाणीव होणे हे सर्वांत मोठे भाग्य आहे. मनुष्यत्वाच्या भाग्याबद्दल माणसाचे तेच आहे.[३३७]

हातात ग्रंथ उचलण्याचेही बळ नसण्याच्या,
शब्द वाचण्याची साधी दृष्टीही दुबळी होण्याच्या
आणि श्रवणासाठी कानांना ऐकू येऊ न
लागण्याच्या-वृद्धापकाळात ज्ञानेश्वरी
वाचण्याचे संकल्प करणाऱ्या 'तरुणां'च्या
दूरदृष्टीचे साक्षात माउलींनाही 'करुणकौतुक'
वाटत असेल ! ३३८

नमस्कारात 'नमन' असेलच
असे नाही, पण 'न-मना'त
मात्र नमस्कार आहे - प्रत्यक्ष,
अप्रत्यक्ष आणि सर्वांनाही !३३९

सगुण माना वा न माना,
पण सगुणाचा अनादर
हा निर्गुणाचा अवमान आहे.

आधीची 'अर्जुनावस्था' आपली
असतेच, पण पुढची त्याची
निःसंदेह, कर्तव्यावस्था
आपल्याला यावी म्हणून गीता
अभ्यासावी. ३४१

ज्यांनी तरूणपणीच जीवनाचे कोडे
सोडवले नाही त्यांना म्हातारपणी त्याच
त्याच जुन्या आठवणी काढीत, इतरांच्या
प्रपंचात लुडबुडी करीत, नाहीतर
शब्दकोडी सोडवीत वेळ काढावा लागतो.

आंब्याला फणस येण्याची अपेक्षा आपण चुकीची समजतो, पण आपल्या अविचारी, बेसावध, चुकीच्या कर्मांना मात्र सुखसमाधानाची फळे येण्याची अपेक्षा बरोबर मानतो, हा विरोधाभास आपल्याला कधी कळेल तो सुदिन!३४३

सद्गुरूंच्या उपदेशाने स्वत:चे हित स्वत:ला कळत गेले आणि तशा कृती वाढू लागल्या म्हणजे गुरूंचा आनंद खरा वाढतो. हे कळले तरी नुसते गुरूंचे काकडे, आरत्या, शेजारत्या, स्तुती, दर्शने यांचे त्यापुढे मूल्य किती कमी आहे हे कळते. ३४४

जगातल्या नश्वरतेची आणि स्वार्थी संबंधांची
नीट कल्पना माणसाला येत नाही आणि
आली तरी ती टिकत नाही, म्हणून !
नाहीतर माणसाला शाश्वत व आनंदाचा
परमार्थ कर म्हणून सांगावेच लागणार नाही!

माणसांची बुद्धी जितकी बोथट,
ढोबळ आणि देहनिष्ठ तितक्या
त्यांच्या करमणुकीच्या कल्पनाही
ढोबळ व उथळ असतात.३४६

भेदबुद्धी वाढायला लागली, की
प्रपंच चांगला जमायला लागला
आणि भेद मावळायला लागले, की
परमार्थ मुरायला लागला!३४७

साद नसतानाही प्रतिसाद ही केवळ भगवंताची कृपा व करुणा आहे आणि ती अनुभवायला येऊ शकते ! ३४८

बहुतेकांना आपला फोटो चांगलाच
देणारे फोटोग्राफर आवडतात.
म्हणून खरी साधना, खरे संत
आणि खरा परमार्थ येथे फारशी
गर्दी नसते.३४९

जग रंगभूमी आहे कळते, पण
आपले जीवनही त्यावरचे
अल्पकाळचे नाटकच आहे असे
समजून राहाता येत नाही, म्हणून
सुखदुःखे भोगावी लागतात.३५०

नाम हे साधकाचे असे शस्त्र आहे, जे
त्याच्या मुक्तीच्या मार्गातल्या सूक्ष्मात
सूक्ष्म शत्रूचा पराभव करीपर्यंत लढते
आणि विजय मिळताच 'शस्त्र'
म्हणून अंतर्धान पावते.३५१

असलेले प्रारब्ध शांतपणे सहन करणे आणि नवे निर्माण होऊ नये यासाठी योग्य कृती करणे - या दोन्हींहीसाठी खऱ्या भक्तीचा उपयोग होतो.३५२

एक वेळ गीता ऐकणाऱ्या किंवा ऐकावी लागणाऱ्या धृतराष्ट्रांची कमी नाही, पण आचरणाऱ्या अर्जुनांची वानवा आहे, म्हणून स्वधर्माचरण सार्वत्रिकपणे दिसत नाही.३५३

परमार्थाच्या ‘अ,आ,इ,ई’त अनुग्रहातला अकार गिरवला, की आस्था, आज्ञापालन व आचरण यातला ‘आ’कार गिरवावा लागतो. अन्यथा इष्टप्राप्तीतली ‘इ’ आणि ईश्वरातली ‘ई’ दूर राहते.३५४

उत्तम प्रवचने ऐकल्यावर (‘सेव्ह’) ‘मेंदूत जपून ठेवावे’ हे बटण दाबायचेच कित्येक श्रोत्यांचे राहून जाते. त्यामुळे अनेक चांगली प्रवचने ऐकूनसुद्धा आठवतही नाहीत, उपयोगीही पडत नाहीत. ३५५

गुरूंना साधनेची व
आचरणाची
'आश्वासने' देणारेच जास्त,
'शब्द' देणारे कमी !३५६

भगवंताच्या कृपेने मनुष्यदेहाच्या
नौकेच्या साधनात बसलोच
आहोत तेव्हा खरे पैलतीर लक्षात
ठेवून प्रवास करूया म्हणजे झाले !

सध्याच्या कर्मांची संधी हा आधीच्या चुकीच्या आणि म्हणून टोचणाऱ्या कर्मांचा काटा काढायला मिळालेला काटा आहे, हे ओळखून काम केले तर लवकर प्रगती होईल ! ३५८

जे आहे हे कळते पण सिद्ध करता
येत नाही ते 'मानणे' ही अंधश्रद्धा
नसून ते कळेपर्यंत दाखवलेले
'समजूतदार मानवी तारतम्य'
आहे ! ३५९

आधी प्रापंचिकता ही वस्तुस्थिती
व परमार्थ हा अभिनय, पण पुढे
पारमार्थिकता ही वस्तुस्थिती
आणि प्रपंच हा अभिनय होणे ही
साधनेतली प्रगती आहे !३६०

मला खरोखरच बिनगरजेचे काही नको असेल तर गरजेचे सर्व भगवंतच पुरवीत असतो - ही धारणा स्वीकारील तर अखिल मानव सुखी राहील.३६१

सदनिका संस्कृती अपरिहार्यतेतून आली. तिने खासगी जीवनाचे कौतुकही आणले. पण सदनिकांना असलेली माणुसकीची दारे कायम बंद ठेवणेही आणले. यांतले नुकसान आता हळूहळू लक्षात येऊ लागले आहे.३६२

जे ज्ञान त्याबरोबर उरलेल्या विशाल
ज्ञानाच्या अज्ञानाची जाणीव
निर्माण करीत नाही ते ज्ञान
अहंभाव देते आणि पुढच्या
प्रगतीच्या वाटाही बंद करते.३६३

संकटे, परिस्थिती, माणसे यांना सामोरे न जाता, त्यांपासून दूर पळण्याचे प्रयत्न म्हणजे आपल्याच शर्टाच्या खिशात ठेवलेल्या वस्तूंपासून दूर जाण्यासाठी तोच शर्ट घालून दूरवर फिरून किंवा गावाला जाऊन येण्यासारखे आहे.३६४

शिष्यच जेव्हा मुक्ती हे अनेक
जन्मांचे काम आहे असे ठरवतात,
तेव्हा याच जन्मी मुक्ती देणारा
सद्गुरूही हतबल होतो. ३६५

खरे शिष्यत्व सांभाळणे
ही गुरुमार्गीची
श्रेष्ठ, खडतर पण अत्यंत
आनंददायी साधना आहे ! ३६६

चिंतनक्षण भाग १ व २ यांतील ६० वचनांवर डॉ. पेठे यांची निरूपणे झाली आहेत. त्यांतील वचनांच्या भाग क्र.१ मधील वचन क्र. १ ते ८ वरील ९ निरूपणांसाठी कृपया येथील खालील प्रकाशन पहावे.

सारविस्तार - भाग : १

चिंतनक्षण भाग १ व २ यांतील ६० वचनांवर डॉ. पेठे यांची निरूपणे झाली आहेत. त्यांतील वचनांच्या भाग क्र.१ मधील वचन क्र. ९ ते १३ वरील ७ निरूपणांसाठी कृपया येथील खालील प्रकाशन पहावे.

सारविस्तार - भाग : २

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यांसाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

* संतछाया, सातारा *